३१

वाचले:-१) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त, यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय कासारवाडी यांच्याकडील जा.क्र.४५०/२०२२
दि.१२/०९/२०२२ चे शिफारस पत्र.
४) दि.२३/०९/२०२२ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिक
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/५९२/२०२२
दि.२९/०९/२०२२

विषय –नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.
**श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव (सहाय्यक शिक्षिका)**
**सं.क्र.७४०१**

आदेश,

**श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** (सहाय्यक शिक्षक) हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक शिक्षक या पदावर दि. ०३/०७/१९९५ रोजी माध्यमिक शिक्षण विभागात रूजू झालेले आहेत. **श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** (सहाय्यक शिक्षक) यांची जन्म तारीख १८/१०/१९६४ अशी असून त्यांच्या वयास दिनांक-१७/१०/२०२२ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने **श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** (सहाय्यक शिक्षक) यांना-३१/१०/२०२२ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्षे पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमाननुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

**श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** (सहाय्यक शिक्षक) यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच **श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** (सहाय्यक शिक्षक) यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणीकर्ज ,वाहनकर्ज, संगणक कर्ज, घरदूरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण कर्ज यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही,तसेच भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम **श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** (सहाय्यक शिक्षक) यांनी मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.

तसेच **श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** (सहाय्यक शिक्षक) यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत ०३/०७/१९९५ ते ०६/१०/१९९८ अखेर सेवासातत्य देण्यात आलेले असून सदर कालावधीचा फरक र.रू.२,१७,०००/- (अक्षरी-दोन लाख सतरा हजार फक्त) **श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** (सहाय्यक शिक्षक) यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करणेत आलेला आहे.

तथापि मा.आयुक्त सो.यांच्याकडील आदेश क्र.माध्य/शि/०१/कावि/७८२/२००७ दि. १८/१२/२००७ अन्वये दिलेल्या सेवासातत्य व फरकावरील रक्कमेस लेखा परिक्षण विभागाने आक्षेप घेतलेले आहेत.त्यानुसार माध्यमिक शिक्षण विभागाने र.रू.२,१७,०००/- (अक्षरी-दोन लाख सतरा हजार फक्त) वसुल करणेबाबत **श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** (सहाय्यक शिक्षक) यांना पत्र बजावणेत आलेले असल्यानेश्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव (सहाय्यक शिक्षक) यांनी मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्याकडे याचिका क्र.३८२३/२०२१दाखल केलेली आहे.

सबब,मी उप आयुक्त,माध्यमिक शिक्षण विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन )नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये दिनांक - ३१/१०/२०२२ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार **सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. व लेखापरीक्षण आक्षेप वसुली रु. रु.२,१७,०००/-**(अक्षरी-दोन लाख सतरा हजार फक्त) बाबत मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्याकडे याचिका क्र.३८२३/२०२१ अंतिम निर्णय आलेनंतर वसुली बाबत अंतिम निर्णय घेणेत येईल. **श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** यांचे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, गट विमा इ. रक्कमा अदा करणेबाबत महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार पुढील कार्यवाही करणेत यावी. प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद **श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** (सहाय्यक शिक्षक) यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(संदिप खोत)
उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
**श्रीम.शिंदे पुष्पा विठ्ठलराव** (सहाय्यक शिक्षक)
माध्यमिक विद्यालय कासारवाडी
प्रतः- १) लेखा शाखा
२)प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय कासारवाडी
२/- पुढील कार्यवाहीसाठी

(रोहिणी शिंदे)
प्रशासन अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८